CNR No. MHRG080003392026

**फौ.चौ.अ.क्र. ३३/२०२६**

स्वाती रजनिकांत गणीना

**विरुध्द**

सरकार/खोपोली पोलीस स्टेशन

## निशाणी क्र. १ खालील आदेश

१. अर्ज व त्यावरील सरकारी अभियोक्ता यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदार **स्वाती रजनिकांत गणीना** यांनी खोपोली पोलीस स्टेशन, खोपोली यांच्याकडील **गुन्हा रजि. नं. ३६/२०२६** या भारतीय न्याय संहीता कलम ५०३ मधील नमुद गुन्ह्यातील खालीलप्रमाणे जप्त सोन्याचे दागीने परत मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

| अ. क्र. | तपशिल / दागिन्याचे वर्णन | वजन | किंमत रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | दोन सोन्याच्या बांगड्या | १६.५०० ग्रॅम | १,००,०००/- |
| २ | एक सोन्याचा हार | ११.३०० ग्रॅम | ६८,०००/- |
| ३ | एक सोन्याची हवल/चैन | २१.३०० ग्रॅम | १,२७,८००/- |
| ४ | एक सोन्याची अंगठी | १.२०० ग्रॅम | ७,०००/- |
| ५ | एक सोन्याचे ब्रेसलेट काळे मणी | ३.८०० ग्रॅम | २०,०००/- |
| | | **अंदाजे एकुण किंमत रुपये** | **३,२२,०००/-** |

३. अर्जदार यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ निशाणी क्र. ४ सोबत अर्जदार हिचे आधार

कार्डची प्रमाणित प्रत, अर्जदार हिचे पुरवणी जबाब प्रत, श्रीनगर ज्वेलर्स, देवी ज्वेलर्स, यांचेकडील पावतींची प्रमाणित प्रत, गुन्हा रजि. नं. ३६/२०२६ ची प्रथम खबरी अहवालाची प्रमाणित प्रत इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

४. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दिनांक १०/०२/२०२५ रोजी सकाळी ०८:२५ वाचताचे सुमारास मुंबई लेनवरील फुडमॉल येथे फिर्यादी यांचे लेडीज पर्स मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिणे फिर्यादीच्या यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या हेतुने स्वतःच्या फायद्याकरीता अटक आरोपी यांनी फिर्यादी यांच्या लेडीज पर्स मधील चोरी केलेला आहे. सदर वर नमूद चोरी झालेला मुद्देमाल खोपोली पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले असुन तो खोपोली पोलीस स्टेशनला पडुन आहे. सदर मुद्देमाल फिर्यादीच्या म्हणजेच अर्जदाराच्या लेडीज पर्स चोरीस गेला आहे. तसेच अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सदरच्या जप्त मुद्देमालाची मागणी केलेली नाही. त्यावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार हेच सदर जप्त मुद्देमालाचे मालक आहेत.

५. सदरचे दोन सोन्याच्या बांगड्या, एक सोन्याचा हार, एक सोन्याची हवल/चैन, एक सोन्याची अंगठी, एक सोन्याचे ब्रेसलेट काळे मणी असा एकुण किंमत रुपये ३,२२,०००/- चा मुद्देमाल जप्त केल्यापासुन खोपोली पोलीस स्टेशन, ता. खालापूर, जि. रायगड येथे पडुन आहे. जर ते तसेच पडुन राहीले तर खराब होतील, परंतु त्याच्या उपभोगापासुन अर्जदार ह्या वंचित राहील. अर्जदारास जप्त मुद्देमाल रोजच्या वापराकरीता लागत आहे. सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मुद्देमाल अर्जदार यांना ताब्यात

देणेबाबत हरकत असल्याचे सांगितले आहे. तसेच अन्वेषण अधिकारी यांनी जप्त मुद्देमाल अर्जदार यांना अटी व शर्तीवर ताब्यात देणेबाबत हरकत नसल्याचे सांगितले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई आंबालाल देसाई वि. गुजरात राज्य (२००२) १० एस.सी.सी.२८३ या प्रकरणात प्रमेय घालुन दिले आहे की भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ अन्वये मुद्देमाल तात्काळ परत करावा. सदर खटल्याची सुनवाणी होवुन अंतिम निर्णय लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने वर नमूद प्रकरणात घालुन दिलेले प्रमेय पाहता जप्त मुद्देमाल काही अटी व शर्तीवर अर्जदार यांच्या ताब्यात देणे न्यायोचित होईल. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. तपासी अधिकारी यांना असा आदेश करण्यात येतो की, त्यांनी खालील वर्णनाचा जप्त मुद्देमाल –

१) १६.५०० ग्रॅम दोन सोन्याच्या बांगड्या किंमत रु. १,००,०००/–

२) ११.३०० ग्रॅम एक सोन्याचा हार किंमत रु. ६८,०००/–

३) २१.३०० ग्रॅम एक सोन्याची हवल/चैन किंमत रु. १,२७,८००/–

४) १.२०० ग्रॅम एक सोन्याची अंगठी किंमत रु. ७,०००/–

५) ३.८०० ग्रॅम एक सोन्याचे ब्रेसलेट काळे मणी किंमत रु. २०,०००/–

सदर वर नमूद मुद्देमाल अर्जदार **स्वाती रजनिकांत गणीना** यांना पुढील अटींवर ताब्यात द्यावेत.

अ) अर्जदाराने वर नमुद जप्त मुद्देमाल ताब्यात घेण्यापुर्वी **५,००,०००/-** चा सुपुर्तनामा तपासी अंमलदार यांच्या समक्ष सादर करावा. सदर तयार सुपुर्तनामा तपासी अंमलदार यांनी सदर प्रकरणात न्यायालयात दाखल करावा.

ब) अर्जदार यांनी न्यायालयाचे परवानगीशिवाय जप्त मुद्देमालामध्ये कोणत्याही प्रकारे बदल अथवा हस्तांतरण करावयाचे नाही. न्यायालय आदेश करील तेव्हा जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करावयाचे आहेत.

क) जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांचे ताब्यात देतेवेळी त्यांचा पंचनामा करण्यात यावा व त्यांचे छायाचित्र काढण्यात यावे व ते कागदपत्र सदर प्रकरणात न्यायालयात दाखल करावे असे अन्वेषण अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते.

ड) सदर आदेशाची एक प्रत खोपोली पोलिस ठाणे **गु.र.क्र. ३६/२०२६** च्या अभिलेखासोबत ठेवण्यात यावी.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH

Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.03.30 14:42:05 +0530

**(श्रीमती एस. एस. देशमुख)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर.

स्थळ – खालापूर.
दिनांक – २७/०३/२०२६.